3.

17, 20, 21

व्यवस्थापन परिषदेची दिनांक १४ जुलै, २०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | संबंधित विभाग | व्यवस्थापन परिषद दिनांक १४ जुलै, २०१८ रोजीच्या बाबी | व्यवस्थापन परिषद दिनांक १४ जुलै, २०१८ बाबींवरील ठराव | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| २. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग | दिनांक ५ मार्च, २०१८ व दिनांक २१ मार्च, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवाही अहवाल सादर. | असा ठराव करण्यात आला की, दि. ५ मार्च, २०१८ व २१ मार्च, २०१८ रोजी व्यवस्थापन परिषदेतील सभेच्या कार्यवाहीचा अहवाल खालील सूचनांसह मंजूर करण्यात आला. तसेच यापुढील कार्यवाहीचा अहवाल देताना सुस्पष्टपणे व अहवाला संदर्भातील कागदपत्रांसहित देण्यात यावा. | नोंद घेतली. |
| | संलग्नता विभाग | | १)बिर्ला महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यासंदर्भात महाविद्यालयाकडून विद्यापीठाला येणारे कोणतेही शुल्क प्रलंबित नसल्याचे प्रमाणप्रत्र संलग्नता विभागाने सादर करावे. | संलग्नता विभागाने पत्र क्र. AFF/ICD/2018-19/1304 dt. 5 September, 2018 नुसार शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ ते आता पर्यंत No Dues प्रमाणपत्र बिर्ला नहाविद्यालयास देण्यात आले आहे. बिर्ला महाविद्यालयाच्या स्थापने पासून महाविद्यालयांने विद्यापीठात जमा केलेल्या शुल्काची वर्ष न्हिाय पावती सहित माहिती मागविण्यात आलेली आहे. |
| | परीक्षा व मुल्यमापन मंडळ | | २)संचालक, परिक्षा मुल्यमापन मंडळ यांनी मेरीट ट्रॅक कंपनीला दिलेल्या चेतावणी पत्राची प्रत व त्याबाबत त्यांनी दिलेले उत्तर सादर करावे. | |
| | वित्त व लेखा विभाग | | ३)वित्त व लेखा अधिकारी यांनी व्यवस्थापन परिषदेच्या दि. ५ मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत बाब.क्र. ५ अन्वये लेखा परिक्षण अहवालातील निदर्शनास आणून दिलेल्या विसंगती वित्त व लेखा समितीमध्ये ठेवण्यात आल्या आहेत किंवा कसे याची कागदपत्रांसहित माहिती सादर करावी. | सन २०१२-१३ चा लेखा परिक्षण अहवालावरील अनुपालनाचे काम सुरू आहे. अहवाल पुढील वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेपुढे माहिती करता ठेवण्यात येईल. |

143

..१/-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आस्थापना विभाग १/३, २/४ | | ४)आस्थापना विभागाने त्यांच्या विभागाशी संबंधीत समितीच्या सर्व बैठका मंगळवारी आयोजित कराव्यात. | आस्थापना १/३ विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/१८-१९/१५२६ दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ नुसार सर्व बैठका मंगळवारी आयोजित करण्यात येतील असे कळविले आहे व बैठक मंगळवारी आयोजित केल्याबाबत श्री. दिपककुमार मा. मुकादम यांना पत्र पाठविले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. |
| ६. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग | डॉ. (श्रीमती) अनुराधा मिश्रा व डॉ. प्रेमसागर विवेक यांना Sabbatical Leave च्या कालावधीतील दिलेल्या वेतनासंबधी निर्णय घेण्याबाबत. | सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेच्या दि. ५ मार्च, २०१८ रोजीच्या बैठकित बाब क्र. ७ अन्वये सॅबिटिकल रजेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे याप्रमाणे सॅबिटिकल रजा शिक्षकांना मान्य करण्यात येवू नये.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, शिक्षकांना संशोधन व शैक्षणिक कामासाठी शिष्यवृत्ती किंवा अनुदान मिळत असल्यास विद्यापीठ स्तरावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही या अटीवर प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षकांना दोन ते चार महिने त्यांच्या खात्यातील किंवा बिनपगारी रजा मंजुर करण्याबाबत<br><br>प्रकरणपरत्वे (case to case basis) शिक्षकांचा प्रस्ताव तपासून व्यवस्थापन परिषदेत निर्णय घेण्यात यावा.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच विद्यापीठावर कमीत-कमी आर्थिक भार पडेल अशी पर्यायी योजना तयार करण्यात यावी. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने पत्र क्र. TAAS(UT)/ICD/2018-19/769 dt. 4 October, 2018 नुसार डॉ. (श्रीमती) अनुराधा मिश्रा व डॉ. प्रेमसागर विवेक यांना Sabbatical Leave च्या कालावधीतील दिलेल्या वेतना संबंधी निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर बाब दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुनश्:च ठेवण्यात आली आहे. |

144

..२/-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | विद्यार्थी विकास विभाग | Permission to purchase a vehicle for the Official use of the Director, Dept. of Students' Development and to provide Driver Facility therewith. | सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, विद्यार्थी विकास विभागातील कामाचे स्वरूप विचारात घेता विभागासाठी सी.एन.जी. वाहन खरेदी करण्यात यावे. तसेच असाही ठराव करण्यात आला की, कोणत्याही विभागास दिलेले वाहन कार्यालयातच पार्किंग करण्यात यावे; परंतु अतिशय अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली तरच वाहन घरी घेऊन जाता येईल; परंतु त्याची माहिती त्वरित प्रशासनास देण्यात यावी.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील सर्व वाहने व चालक सामान्य प्रशासन विभागाच्या नियंत्रणाखाली असावीत. विद्यापीठात यापुढे वाहन खरेदी करताना सी.एन.जी, वाहन खरेदी करण्यात यावे. काही कालावधीसाठी विभागांनी ओला, उबेर, किंवा भाडेतत्वांवर गाडया वापरण्यात याव्यात. वाहन खरेदी करतांना विद्यापीठाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करण्यात यावा.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, विविध विभागांमध्ये विस्कळीत स्वरूपात असलेल्या भंगाराची योग्य प्रकारे तातडीने विल्हेवाट लावण्यासाठी भंगार समिती त्वरीत गठीत करावी. | विद्यार्थी विकास विभागाने पत्र क्र. DSWIB/ICD/2018-19/290 दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ नुसार वित्त व लेखा अधिकारी यांच्याशी चर्चा करून सी.एन.जी. वाहन खरेदी करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल व दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्यात येईल, असे कळविले आहे.<br><br>तसेच<br><br>सामान्य प्रशासन विभागाने पत्र क्र. GAD/ICM/2018-19/758 dt. 3 October, 2018 नुसार सदर बाबत पुढील कार्यवाही सुरु आहे असे कळविले आहे. |

145

..३/-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | विद्यार्थी विकास विभाग | Proposal regarding constitution of the new Scrutiny Committee for the <u>Vice-Chancellor's</u> <u>Fund</u> (Financial Assistance towards Medical Expenses to the Non-Teaching employees of the University of Mumbai) | असा ठराव करण्यात आला की, विषयांचे गांभिर्य लक्षात घेऊन कुलगुरू निधीमधून शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वैद्यकीय भत्ता मिळण्यासाठी वेळोवेळी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी कुलगुरूनी गठित केलेल्या छाननी समितीची नोंद घेण्यात यावी. | नोंद घेतली. |
| | | | असाही ठराव करण्यात आला की सदर योजनेचे स्वरूप विचारात घेता ही योजना विद्यार्थी विकास विभागाऐवजी आस्थापना (२/४) या विभागाने हाताळावी. | विद्यार्थी विकास विभागाने पत्र क्र. DSWIB/ICD/2018-19/290 दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ नुसार आस्थापना विभागाने पुढील कार्यवाही करावी याबाबत आस्थापना विभागास पत्र पाठविले आहे. |
| | | | सदर योजनेची नियमावली महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील विविध कलमा अतंर्गत केली असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कोणत्या कलमानुसार ही नियमावली लागु राहील याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी, अशी मागणी श्री दिपककुमार मुकादम यांनी केली. त्यावर कुलगुरूंनी स्पष्ट केले की, पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल. | विद्यापीठाचे विधी सल्लागार श्री महेश शुक्ला यांनी पत्र क्र.एल.पी.एन./२०१८/७९/एल.सी. दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ नुसार प्रभारी कुलसचिव यांना सदर योजनेची नियमावली बाबत पत्राने कळविले आहे. |
| | | | असाही ठराव करण्यात आला की, गरज पडल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अतंर्गत नवीन छाननी समिती स्थापन करण्यात यावी व नवीन कुलगुरू निधी नियम बनविण्यात यावेत. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | विद्यार्थी विकास विभाग | गट विमा योजना नुतनीकरण करण्यास झालेल्या विलंब कालावधी दरम्यान विद्यापीठाच्या कर्मचा-यांनी सादर केलेली देयक अदायगीस मंजुरी मिळणेबाबत. | असाही ठराव करण्यात आला की, बाब क्र. ९ बाबत कुलगुरूंनी नेमलेल्या समितीने (कुलगुरू निधीसाठी छाननी समिती) गट विमायोजना नुतनीकरणास झालेल्या विलंब कालावधीत विद्यापीठाच्या एकूण २३ कर्मचा-यांनी सादर केलेली दि. १८ जुलै,२०१७ ते दि. २१ सप्टेंबर २०१७ या कालावधीतील रू. ९,२१,४५३/- वैद्यकीय देयके तपासून योग्य ती शिफारस कुलगुरूंना करण्यात यावी.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, सदर योजनेचे स्वरूप लक्षात घेता सदर योजनेचे कामकाज विद्यार्थी विकास विभागाऐवजी आस्थापना (२/४) या विभागाने हाताळावी. | सदर बाबत विद्यार्थी विकास विभागाने पत्र क्र. DSWIB/ICD/2018-19/290 दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ नुसार आस्थापना विभाग २/४ यांना याबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी पत्र पाठविले आहे. |
| ११. | विद्यार्थी विकास विभाग | Formation of an Advisory Committee for the Academic Year 2018-19 to guide the Director, Students Development for the disbursement of the financial assistance to the students of affiliated college and departments of the university under the various schemes. | असा ठराव करण्यात आला की, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांना विविध योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य वाटप करण्यासाठी सल्लागार समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, सदर समिती कोणत्या कलमांतर्गत गठित होते यासंदर्भात विद्यार्थी विकास विभागाने माहिती विधी विभागाकडून प्राप्त करून व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत देण्यात यावी. | विद्यार्थी विकास विभागाने पत्र क्र. DSWIB/ICD/2018-19/290 दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ आणि पत्र क्र. DSWIB/ICD/2018-19/261 दिनांक १० सप्टेंबर, २०१८ नुसार महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ चॅप्टर IV 56 (I) (f) कलमांतर्गत विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय वाटप करण्यासाठी मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांनी सल्लागार समिती गठित केली आहे. |

147

..५/-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग | Proposal for installation of Astro Football Turf. | असा ठराव करण्यात आला की, यू.ओ. स्पोटर्स इंडिया यांनी सादर केलेला ऍस्ट्रो फुटबॉल टर्फचा प्रस्ताव **अमान्य** करण्यात यावा. | ---- |
| १३. | शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग | To take disciplinary action against the players of Mumbai University Cricket Team. | सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, सविस्तर माहितीसह सदर प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. | ही बाब दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी होणा-या व्यवस्थापन परिषदेच्या पटलावर ठेवण्यात आली आहे. |
| १५. | मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स व पब्लिक पॉलिसी | Presentation by MSE-PP on various project. | असा ठराव करण्यात आला की, मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स व पब्लिक पॉलिसी (अर्थशास्त्र विभाग) या विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांबाबत व्यवस्थापन परिषदेत केलेल्या सादरीकरणाची नोंद घेण्यात आली. | नोंद घेतली. |
| १६. | Thesis Section | Work pertaining to online PET examination of 2018, i.e. from the acceptance of application forms to the declaration of results to be entrusted to M.K.C.L. | असा ठराव करण्यात आला की, पी.ई.टी. (PET) ची परिक्षा ऑनलाईन घेण्याकरिता व परिक्षेचा अर्ज ऑनलाईन घेण्यापासून निकाल तयार करणेपर्यतच्या सर्व प्रक्रिया सुलभ रितीने पार पाडण्यासाठी एम.के.सी. एल यांच्या मार्फत घेण्यासाठी मान्यता देण्यात यावी.<br>एम. के. सी. एल. सोबतचा सामंजस्य करार अवलोकनार्थ व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. | दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ चे नोटीफिकेशन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे व PET परीक्षेसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू आहे. |
| १७. | Special Cell | To decide the format of the advertisement and its charges for publication in newspapers and on University website. | सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, महाविद्यालयांची एकत्रित जाहिरात वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी महाविद्यालयांकडून आकारावयाचे शुल्क तसेच CAS सर्विस प्रोव्हायडर मे. निर्मल सॉफ्टवेअर यांना दयावयाच्या शुल्काबाबत सविस्तर माहितीसह दोन स्वतंत्र बाबी व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात याव्यात. | कार्यवाही सुरू आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | विद्यार्थी विकास विभाग | A proposal regarding the renewal of Yuva Raksha Group Insurance Scheme for the benefit of the Students enrolling through the affiliated colleges and the teaching departments of the University of Mumbai. | सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागातील व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी युवा रक्षा ग्रुप इन्शुरन्स योजना मेसर्स ओरियंटल कंपनी लिमिटेड यांच्यामार्फत सन २०१८-१९ व २०१९-२०२० या वर्षाकरिता मान्यता देण्यात यावी.<br><br>नॅशनल इश्युरन्स कंपनीकडून सदर योजने अंतर्गत सहकार्य लाभत नसल्याने त्याबाबत काय कार्यवाही केली याचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सविस्तर सादर करण्यात यावा. | विद्यार्थी विकास विभागाने पत्र क्र. DSWIB/ICD/2018-19/290 दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ व पत्र क्र.DSWIB/ICD/2018-19/261 दिनांक १० सप्टेंबर, २०१८ आणि पत्र क्र. DSWIB/ICD/2018-19/489 दिनांक १० सप्टेंबर, २०१८ नुसार नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून सदर योजने अंतर्गत सहकार्य लाभत नसल्याने व नॅशनल इन्शुरन्स कंपनीचा अल्प प्रतिसाद पाहता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी हे काम ओरिएंटल इन्शुरन्स या कंपनीला द्यावे यासाठीची विनंती व्यवस्थापन परिषदेला केली होती.<br><br>याबाबत पत्र क्र.SW/20/2018-19 दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ नुसार युवा रक्षा ग्रुप इन्शुरन्स योजने बाबत ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांना शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ आणि २०१९-२०२० साठी सेवा देण्याबाबतचे पत्र पाठविले आहे. |
| १९. | Mumbai School of Economics & Public Policy (APD) | MOU between Mumbai School of Economics & Public Policy (Autonomous) and Vidarbha Irrigation Development Corporation (VIDC), Government of Maharashtra for research and evaluation for various policies and other aspects related to water resources in Vidarbha in the state of Maharashtra. | It was resolved that MOU between Mumbai School of Economics & Public Policy (Autonomous) and Vidarbha Irrigation Development Corporation (VIDC), Government of Maharashtra for research and evaluation for various policies and other aspects related to water resources in Vidarbha in the State of Maharashtra, be accepted subject to the following modifications : -<br><br>1) Jurisdiction of the arbitration shall be Mumbai and arbitration expenses shall be borne by the VIDC. | मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था (स्वायत्त) विभागाने ई-मेल द्वारे पुढीलप्रमाणे कळविले आहे. The MOU of Vidarbha Irrigation Devt. Corporation with Mumbai School of Economics and Public Policy placed in the MC meeting held on 14 July, 2018 (Item No. 19) has been signed by the authorities (Registrar, Mumbai University and an authorized signatory of VIDC) and further work is in progress. |

..७/-

169

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 2) MOU shall be signed by the Registrar as per section 14 of the Maharashtra Public Universities Act, 2016.<br>3)The amount should be deposited in the University Account and all financial transactions shall be made through Finance and Accounts Officer.<br><br>Further, it was also resolved that any appointment made under the scheme shall be on contract for service for fixed period and shall not be entitled for any benefit of the University including service benefits and there shall not be any financial burden on the university. | |
| २०. | विद्याविषयक प्राधिकरणे | विद्वत परिषदेच्या दि. १४/०६/२०१८ रोजीच्या सभेमध्ये खालील बाबींवर केलेल्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ प्रस्ताव सादर. | असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेच्या दि. १४ जुन, २०१८ रोजीच्या विद्वत सभेतील बाब क्रमांक ४.२५, ४.२६, ४.२९, ४.३१, ४.३२, ४.३५, ४.५५ ४.६१ आणि ४.६२ अन्वये पारित करण्यात आलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या. | विद्याविषयक प्राधिकरणे विभागाने पत्र क्र.ए.ए./आयसीडी/२०१८-१९/३४० दि. २० जुलै, २०१८ नुसार पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विभागास पुढील कार्यवाही करण्याबाबत पत्र पाठविले आहे. पुढील कार्यवाही सुरू आहे. |
| २१. | विद्याविषयक नियोजन व विकास | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कल्याण येथील उपकेंद्र सुरू करण्याबाबत. | असा ठराव करण्यात आला की, सन २०१८-२०१९ पासून कल्याण येथील उपकेंद्र सुरू करण्यात यावे व त्यात आयडॉल (IDOL) केंद्रासह विविध प्रकारच्या प्रशासकीय सुविधा सुरू करण्यात याव्यात आणि अभियांत्रिकी पदव्युत्तर अभ्यासक्रम केंद्रामार्फत सुरू करण्यात यावे.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, ठाणे केंद्र आणि कल्याण केंद्रासाठी आवश्यक तो शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. | कल्याण उपकेंद्रामध्ये दुर व मुक्त अध्ययनाची सुविधा सुरू केली आहे. |

150

..९/-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेला विषय-** | | |
| २६. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग | विद्यापीठ सेवेत निवड करण्याबाबत व आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पदोन्नतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०२ (२) (g) आणि संचालित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची नियुक्ती करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०४ (e) नुसार व्यवस्थापन परिषदेने, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य निवड समितीवर नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. | असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ सेवेत शिक्षकांची निवड करण्यासाठी व आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पदोन्नतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील कलम १०२ (२) (g) नुसार एका प्राचार्यांचे नामनिर्देशन व संचलित महाविद्यालयाच्या प्रार्चायांची विद्यापीठातील संस्थांच्या संचालकांची नियुक्ती करण्याकरिता कलम १०४ (e) नुसार एका प्राचार्यांचे निवड समितीवर नामनिर्देशन करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने पत्र क्र. TAAS(UT)/ICD/2018-19/769 dt. 4 October, 2018 रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ सेवेत शिक्षकांची निवड करण्याबाबत व आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पदोन्नतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०२ (२) (g) एका प्राचार्याचे नामनिर्देशन व संचालीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांची विद्यापीठातील नियुक्ती करण्याकरिता कलम १०४ (e) नुसार मा. कुलगुरूंनी डॉ. अजय भामरे यांचे नामनिर्देशन केले आहे. त्या अनुषंगाने १८ व १९ सप्टेंबर, २०१८ रोजी CAS च्या मुलाखती संपन्न झाल्या आहेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | चर्चेच्या अनुषंगाने | | |
| | | | 1)As there is budgetary provision for the training of staff, training to the staff be started immediately. Training for Stress Management be given by the Department of Psychology. | आस्थापना १/३ विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/१८-१९/१५२६ दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ नुसार द्वितीय सत्राच्या परीक्षा सुरू होत असल्याने परीक्षा विभागातील कर्मचारी वगळून इतर विभागातील कर्मचा-यांकरिताचे stress Management करताचे Training कार्यशाळेचे आयोजन लवकरच आयोजित करण्यात येईल असे कळविले. |
| | वित्त व लेखा विभाग | | २)विद्यापीठाला आयकरामध्ये कर सवलत आहे का याबाबत माहिती वित्त व लेखा विभागाने तपासून व्यवस्थापनाच्या पुढील बैठकीत देण्यात यावी. | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १० सप्टेंबर, २०१८ च्या बैठकीत बाब क्र. २९ अन्वये व्यवस्थापन परिषदेने याबाबत सी.ए. फर्म नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. कार्यवाही सुरू आहे.<br><br>वित्त व लेखा विभागाने पत्र क्र. एडी/अ.ले.प. /३४६/२०१८ दि. ५ ऑक्टोबर, २०१८ अन्वये विद्यापीठाने दि. २५ सप्टेंबर, २०१८ रोजी अंतर्गत लेखा परिक्षक तथा कर सल्लागारच्या नेमणूकीकरिता निविदा प्रसारीत केली आहे. सद्यस्थितीत विद्यापीठास आयकर कायदा १९६० नुसार १० (२३) या उप कलमा अंतर्गत कर सवलत आहे. |

टिप - व्यवस्थापन परिषदेत सादर केलेल्या कार्यवाही अहवालाबाबत संबंधित विभागाकडून प्राप्त झालेली मुळ कागदपत्रे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पडताळणीसाठी आवश्यक असल्यास उपलब्ध करून देण्यात येतील.

मुंबई - ४०० ०३२
२१ नोव्हेंबर, २०१८.

कुलसचिव (प्र.)
(मुंबई विद्यापीठ)

152